**<u>ठळक बातम्या</u>**

- गावखेड्यांचं रूपांतर समृद्धी आणि संधींचं प्रकाशमान केंद्र म्हणून करायला केंद्र सरकार प्राधान्य देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- देशाच्या ग्रामीण भागातलं दारिद्र्याचं प्रमाण २०२३ - २४ या आर्थिक वर्षात ५ टक्क्यांपर्यंत खाली आल्याचा भारतीय स्टेट बँकेच्या अहवालात निष्कर्ष

- सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील दोन फरार आरोपींना बीड पोलीस दलाच्या विशेष पथकानं केली अटक

- ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या कसोटी सामन्यात भारताची पहिल्या डावात ऑस्ट्रेलियावर ४ धावांची माफक आघाडी, मात्र दुसऱ्या डावात भारताची फलंदाजी पुन्हा गडगडली.

**आणि**

- उत्तर भारतात अनेक ठिकाणी कडाक्याची थंडी आणि दाट धुक्यामुळे जनजीवन विस्कळीत

**<><><><><>**

गावखेड्यांचं रूपांतर समृद्धी आणि संधींचं प्रकाशमान केंद्र म्हणून करायला तसंच ग्रामीण भारताला सक्षम करायला केंद्र सरकारचं प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत ग्रामीण भारत महोत्सवाचं उदघाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. वर्ष २०१४ पासून केंद्र सरकार सातत्यानं ग्रामीण भारताच्या विकासासाठी कार्यरत असून ग्रामीण जनतेला प्रतिष्ठेचं जीवन प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. देशातल्या प्रत्येक गावात सर्व आवश्यक सोईसुविधा असाव्यात यासाठी केंद्र सरकारने अनेक योजना कार्यान्वित केल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. ग्रामीण समाजाला स्वयंपूर्ण बनवण्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांना तीन लाख कोटी रुपयांची मदत करण्यात आल्याचं ते म्हणाले. याशिवाय स्वच्छभारत अभियान, पीएम आवास, जल जीवन मिशन, शुद्ध पेय जल व्यवस्था,निरामय आयुष्यासाठी आरोग्यसेवा यांसारख्या योजना सुरु असून केंद्रीयमंत्रिमंडळानं नुकतीच पीएम पीक विमा योजनेला आणखी एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे, गेल्या १० वर्षात कृषी कर्जाच्या रकमेत साडे तीन पट वाढ झाली. आता पशुपालक आणि मत्स्यपालकांनाही किसान क्रेडिट कार्ड दिले जात आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी या महोत्सवात सहभागी झालेल्या कारागिरांशी संवाद साधला. या महोत्सवाला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी उपस्थित होते.

<><><><><>

देशाच्या ग्रामीण भागातलं दारिद्र्याचं प्रमाण २०२३-२४ या आर्थिक वर्षात जवळपास ५ टक्क्यांपर्यंत खाली आलं आहे. हे प्रमाण २०११-२०१२ या आर्थिक वर्षात जवळपास २७ टक्के इतकं होतं. भारतीय स्टेट बँकेच्या अहवालात ही आकडेवारी समोर आली आहे. गेल्या १२ वर्षांमध्ये शहरी भागातलं दारिद्र्याचं प्रमाणही १३ पूर्णांक ७ शतांश टक्क्यांवरून ४ पूर्णांक ९ शतांश टक्क्यांवर आलं आहे. ग्राहकांच्या क्रयशक्तीत झालेली वाढ आणि सरकारच्या सकारात्मक धोरणांमुळे ग्रामीण भागातल्या दारिद्र्याच्या प्रमाणात ही मोठी घट झाल्याचं अहवालातून दिसून आलं आहे.

<><><><><>

डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ च्या अंमलबजावणीच्या दृष्टीने इलेक्ट्रॉनिक्स आणि  माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण नियमावली, २०२५ चा मसुदा तयार केला आहे. केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हा मसुदा प्रसिद्ध केला. नागरिकांच्या डिजिटल स्वरुपातल्या वैयक्तिक तपशीलांची गोपनीयता कायम राखण्यासाठी कायद्याची चौकट मजबूत करण्याच्या हेतूने ही नियमावली तयार करण्यात आली आहे. यामध्ये आवश्यक तपशील आणि कारवाईबाबतचा मसुदा यांचा समावेश आहे. नागरिकांनी या नियमावलीच्या मसुद्याविषयीचे आपले अभिप्राय आणि सूचना कराव्यात, असं  आवाहन मंत्रालयानं  केलं  आहे.

My.Gov पोर्टलवर १८ फेब्रुवारीपर्यंत सादर कराव्यात, असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि इराण दरम्यान काल नवी दिल्लीत झालेल्या एकोणिसाव्या परराष्ट्र व्यवहार विषयक सल्लागार बैठकीत दोन्ही देशांमधल्या द्विपक्षीय संबंधांना उजाळा देण्यात आला. यावेळी चाबहार बंदर, कृषी सहकार्य, व्यापार आणि आर्थिक क्षेत्रासह  इतर अनेक मुद्द्यांवर व्यापक चर्चा झाली. याशिवाय अफगाणिस्तान आणि पश्चिम आशिया मधल्या घडामोडींसह इतर प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर देखील चर्चा झाली.

**<><><><><>**

भारतीय सेनादल हे जगातल्या सर्वोत्तम सेनादलांपैकी एक असून भूदल, नौदल आणि वायुदल अशा कोणत्याही मार्गाने होणाऱ्या हल्ल्याला तोंड द्यायला सक्षम आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. समर्थ भारत, सक्षम सेना या संकल्पनेअंतर्गत लष्कराच्या दक्षिण कमांडने पुण्यात आयोजित केलेल्या नो युवर आर्मी मेळाव्याच्या उद्घाटनाच्या वेळी ते काल बोलत होते. या उपक्रमाद्वारे नागरिकांना जवानांशी संवाद साधता येईल, युवकांना सैन्यदलात भरती होण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे या दोन फरार आरोपींना बीड पोलीस दलाच्या विशेष पथकानं आज सकाळी पुण्यात अटक केली. या दोघांना पुढील तपासासाठी सी आय डी च्या ताब्यात देण्यात येणार आहे, असं पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी सांगितलं .

या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना फरार घोषित केलं होतं. कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या, सिडनी इथं सुरू असलेल्या पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात, भारतानं दुसऱ्या दिवसअखेर आपल्या दुसऱ्या डावात ६ बाद १४१ धावा केल्या आहेत. आज सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतानं, ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव केवळ १८१ धावांत गुंडाळला आणि पहिल्या डावात ४ धावांची माफक आघाडी मिळवली. भारताच्या वतीनं मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ३ तर जसप्रीत बुमराह आणि नितेश रेड्डी यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताचा डाव पुन्हा एकदा गडगडला. मात्र ऋषभ पंत यानं ३३ चेंडूत ६६ धावा करत भारताच्या धावसंख्येत मोठी भर घातली. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा रविंद्र जडेजा ८ धावांवर तर वॉशिंग्टन सुंदर ६ धावा करून खेळपट्टीवर टिकून होते. दरम्यान या सामन्यासाठी कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळत असलेला जसप्रित बुमराह

याला सामना सोडून वैद्यकीय तपासणीसाठी जावं लागल्यानं, त्याच्या तंदुरुस्तीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

<><><><><>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल बुद्धिबळपटू कोनेरू हंपी आणि तिच्या कुटुंबीयांची नवी दिल्लीत भेट घेतली. कोनेरू ही क्रीडा क्षेत्रातलं प्रेरणादायी व्यक्तिमत्व असून, उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा देत आली असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. खळेमधली तिची विद्वत्ता आणि आणि निष्ठा ठळकपणे दिसते अशा शब्दांत प्रधानमंत्र्यांनी कोनेरु हंपी हिची प्रशंसा केली आहे.

<><><><><>

न्यूझीलंडच्या ऑकलंडमध्ये सुरु असलेल्या ए एस बी क्लासिक टेनिस स्पर्धेत पुरुष एकल प्रकारात भारताच्या सुमित नागलनं न्यूझीलंडच्या अलेक्झांडर क्लीचारोवचा १-६, ६-३, ६-१ असा पराभव केला. उद्या होणाऱ्या अंतिम पात्रता फेरीत त्याची गाठ फ्रान्सच्या एड्रियन मॅनेरिनो याच्याशी पडणार आहे.

<><><><><>

गाजा पट्टीत संपूर्ण संघर्षविराम व्हावा, यासाठी कतारच्या दोहामध्ये इस्त्रायलबरोबर अप्रत्यक्ष  चर्चा सुरु झाली आहे. हमासनं या वृत्ताला दुजोरा दिला आहे. व्यापक आणि  अस्थायी संघर्ष विराम तसंच गाजामधून इस्त्रायली सैनिकांची माघार हे मुद्दे या चर्चेच्या केंद्रस्थानी असतील.

**<><><><><>**

उत्तर भारतात अनेक ठिकाणी कडाक्याची थंडी आणि दाट धुक्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि हरियाणात रस्ते वाहतूक संथ गतीनं सुरू असून प्रवाशांना दाट धुक्यातून मार्ग काढावा लागत आहे. कमी दृश्यमानतेमुळे रेल्वेसेवेवर देखील परिणाम झाला असून दिल्लीकडे जाणाऱ्या ४९ गाड्या चार तास विलंबानं धावत आहेत. दाट धुक्यामुळे दिल्ली विमानतळावरील विमानसेवाही काही अंशी विस्कळीत झाली आहे.

येत्या दोन दिवसांत वायव्य आणि मध्य भारतात काही भागांत दाट धुकं आणि थंडीचा कडाका कायम राहील असा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्ली आणि उत्तर प्रदेशच्या काही भागात पुढील दोन दिवसात दाट धुक्याची शक्यता आहे तर जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान आणि मुजफ्फराबाद मध्ये मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टीचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**